Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड दर्पण

वरुड | गुरुवार
०४.०६.२०२६

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १२४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### गोविंदा, चंकी पांडे यांना लॉन्च करणारे प्रख्यात सिनेनिर्माते पहलाज निहलानी यांचं निधन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - प्रख्यात चित्रपट निर्माते आणि सेन्सॉर बोर्डाचे माजी अध्यक्ष, पहलाज निहलानी यांचं निधन झाले आहे. वयाच्या ७९ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. पहलाज निहलानी हे गेल्या काही काळापासून यकृताशी संबंधित आजारांशी लढा देत होते. पण, मृत्यूशी त्यांची झुंज अखेर अपयशी ठरली. गुरुवार, ४ जून रोजी मुंबईतील त्यांच्या राहत्या घरी त्यांची प्राणज्योत मालवली आणि त्यांनी जगाचा निरोप घेतला. पहलाज निहलानी यांचं हृदयविकाराच्या झटक्यानं निधन अध्यक्ष बी. एन. तिवारी यांनी पहलाज निहलानी यांच्या निधनाच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

# कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाचा धसका?

## केंद्र सरकारकडून कारवाईचा पहिला हातोडा, दोघांची उचलबांगडी!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - कॉकरोच जनता पार्टीने दिल्लीत पहिली पत्रकार परिषद घेतली. पक्षाच्या तीन प्रवक्त्यांनी प्रथमच जनतेला संबोधित करून आपल्या मागण्या मांडल्या. त्यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीचा पुनरुच्चार केला आणि सरकार व विरोधी पक्ष या दोघांशीही संवाद साधण्यास तयार असल्याचे सांगितले. सीजेपीचे प्रवक्ते सौरभ दास यांनी सीबीएसईचे अध्यक्ष राहुल सिंह आणि सचिव हिमांशू गुप्ता यांच्या बदल्या केवळ दिखावा असल्याचे म्हटले आहे. शिक्षण व्यवस्थेत उत्तरदायित्व प्रस्थापित झाले पाहिजे आणि केवळ बदल्यांनी समस्या सुटणार नाही, असे त्यांनी म्हटले.

सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके ६ जून रोजी अमेरिकेतून दिल्लीत दाखल होतील. त्यानंतर ते जंतर मंतर येथे आंदोलनासाठी परवानगी मागण्यासाठी पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्यात जातील. पक्षाने देशभरातील तरुणांना या आंदोलनात सामील होण्याचे आवाहन केले आहे. हवामान कार्यकर्ते सोनम वांगचुक हे देखील या आंदोलनात सामील होऊ शकतात, असा दावा पक्षाने केला आहे. सीजेपी नेत्यांनी सांगितले की, हे आंदोलन शिक्षण व्यवस्था आणि राजकीय व्यवस्थेबद्दल तरुणांमध्ये वाढणाऱ्या असंतोषाचे प्रतिबिंब आहे.




दरम्यान, केंद्र सरकारने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी संबंधित मुद्द्यांवर एक मोठे पाऊल उचलले आहे. उइडए चे अध्यक्ष राहुल सिंह आणि सचिव हिमांशू गुप्ता यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. उइडए च्या 'ऑन-स्क्रीन मार्किंग' प्रणालीमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेल्या कथित अनियमिततेनंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. ऑन-स्क्रीन मार्किंगबाबत चौकशी समितीही स्थापन उइडए ने ऑन-स्क्रीन मार्किंग प्रक्रियेतील अनियमिततेची चौकशी करण्यासाठी एक चौकशी समितीही स्थापन केली आहे. ही समिती सखोल चौकशी करेल. या समितीची नियुक्ती क्षमता विकास आयोगाच्या अध्यक्षा एस. राधा चौहान यांच्याकडे करण्यात आली आहे. गरज भासल्यास त्या इतर विभागांतील अधिकाऱ्यांची मदत घेऊ शकतात. याव्यतिरिक्त, समितीला सचिवालयीन सहाय्य पुरवण्याची जबाबदारीही क्षमता विकास आयोगावर सोपवण्यात आली आहे. ही समिती एका महिन्याच्या आत आपली चौकशी पूर्ण करून कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाला आपला अहवाल सादर करेल.

# मंत्री नितेश राणे यांच्या शिष्टाईला यश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषद निवडणुकीचा अर्ज मागे घेण्यासाठी अवघे दोन तास शिल्लक राहिलेले असतानाच कोकणच्या राजकारणात मोठा 'ट्विस्ट' पाहायला मिळाला.

महाविकास आघाडीचे (उबाठा) अधिकृत उमेदवार बाळ माने यांनी शेवटच्या क्षणी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि रत्नागिरी जिल्ह्याचे भाजप संपर्क प्रमुख नितेश राणे यांच्या यशस्वी शिष्टाईमुळे हा राजकीय चमत्कार घडला असून, बाळ माने थेट नितेश राणे यांच्यासोबतच रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचल्याने राजकीय वतुर्ळात सर्वांच्या भुवया उंचावल्या. माने यांच्या माघारीमुळे आता कोकण विधानपरिषदेची निवडणूक बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, हा उबाठा गटासाठी मोठा धक्का



मानला जात आहे. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी गुरुवारी दुपारी स्वतः नितेश राणे हे बाळ माने यांना सोबत घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले. तेथे माने यांनी अधिकृतपणे माघार घेतल्याचे जाहीर केले.

उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर बाळ माने यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत महाविकास आघाडीतील अंतर्गत धुसफुशीवर नाराजी व्यक्त केली. माने म्हणाले, 'उमेदवारी अर्ज भरताना सूचक म्हणून मला महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या सह्या मिळाल्या नाहीत. मविआतील घटक पक्षांकडून मला कोणतीही राजकीय साथ लाभली नाही. पक्षाचे मतदार असलेल्या स्थानिक लोकप्रतिनिधींपैकी काही मंडळी चक्क तीर्थयात्रेला निघून गेली आहेत, त्यामुळे मला मतदारच भेटत नव्हते. अशा परिस्थितीत मी काय करणार? मला या निवडणुकीत होणारा संभाव्य घोडेबाजार टाळायचा होता, म्हणूनच मी नाईलाजाने या निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे.' माने यांनी देवाभाऊंच्या शब्दाचा मान राखला - नितेश राणे या संपूर्ण घडामोडींवर बोलताना मंत्री नितेश राणे यांनी बाळ माने यांच्या भूमिकेचे स्वागत केले.

# पुणे विषारी दारू प्रकरणात नवी मुंबईतील बाप-लेक अटकेत

## घातक रसायने पुरविल्याचे उघड, आतापर्यंत ३३३ जणांवर कारवाई

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** - पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात २२ जणांचा बळी घेणाऱ्या विषारी दारू प्रकरणात गुन्हे अन्वेषण विभागाने नवी मुंबईतील बाप-लेकाला अटक केली आहे. बनावट दारू तयार करण्यासाठी वापरण्यात आलेल्या घातक रसायनांचा पुरवठा केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अरुण जगदंब चौबे (५९) आणि अभिषेक अरुण चौबे (२४) अशी असून दोघेही नवी मुंबईतील वाशी परिसरातील रहिवासी आहेत. विषारी दारू रॅकेटच्या तपासादरम्यान समोर



आलेल्या माहितीनंतर सीआयडीच्या विशेष पथकाने ही कारवाई केली.

घातक रसायनांचा पुरवठा केल्याचा आरोप तपासादरम्यान विषारी दारू तयार करण्यासाठी वापरण्यात आलेल्या धोकादायक रसायनांचा पुरवठा चौबे पिता-पुत्रांनी केल्याचे समोर आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. पुरवठा साखळीतील त्यांच्या भूमिकेचा मागोवा घेत सीआयडीने दोघांना नवी मुंबईतून ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना पिंपरी येथील न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने दोघांनाही चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. रसायनांचा स्रोत, वितरण व्यवस्था आणि या रॅकेटशी संबंधित इतर दुव्यांचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.


मुख्य सूत्रधार आधीच जाळ्यात या प्रकरणात यापूर्वीच कथित मुख्य सूत्रधार योगेश वानखेडे आणि त्याच्या काही साथीदारांना अटक करण्यात आली आहे. २० हून अधिक जणांचा मृत्यू झाल्यानंतर या संपूर्ण प्रकरणाचा तपास महाराष्ट्र सरकारने सीआयडीकडे सोपवला होता.

# 'पीएम सूर्यघर मोफत वीज योजने'त महाराष्ट्राचा महाविक्रम

## ४ हजार ७०० हून अधिक घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवून राज्य देशात अव्वल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'पीएम सूर्यघर मोफत वीज योजने'ची अंमलबजावणी करण्यात महाराष्ट्र राज्याने संपूर्ण देशात अव्वल स्थान पटकावत एक नवा महाविक्रम प्रस्थापित केला आहे. या योजनेच्या अंतर्गत राज्यातील तब्बल ४ हजार ७०० हून अधिक घरांच्या छतांवर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प यशस्वीपणे बसवण्यात आले असून, एवढ्या मोठ्या प्रमाणावर सौर पॅनेल्स बसवणारे




महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याच्या ऊर्जामंत्र्यांनी या कामगिरीबद्दल महावितरणसह संपूर्ण ऊर्जा विभागाचे कौतुक केले असून, हा राज्याच्या ऊर्जा क्षेत्रातील ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील १ कोटी घरांना मोफत वीज पुरवण्याच्या उद्देशाने 'पीएम सूर्यघर योजना' सुरू केली होती. महावितरणने राज्यभरात राबवलेली जनजागृती मोहीम आणि तांत्रिक मंजुऱ्या देण्याची सुटसुटीत केलेली प्रक्रिया यामुळे अवघ्या काही महिन्यांतच ४ हजार ७०० हून अधिक कुटुंबांनी आपल्या घरांवर हे सौर प्रकल्प कार्यान्वित केले आहेत. सौर पॅनेल बसवण्यासाठी केंद्र सरकारकडून ग्राहकांना मोठी सबसिडी (अनुदान) दिली जात असल्याने, मध्यमवर्गीय नागरिक आणि गृहनिर्माण सोसायट्यांसाठी हा प्रकल्प अत्यंत फायदेशीर ठरत आहे.

# दिलीप वळसे-पाटील यांनी घेतली शरद पवारांची भेट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी गुरुवारी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची मुंबईतील 'सिल्व्हर ओक' या निवासस्थानी जाऊन भेट घेतली.

विधानपरिषद निवडणुकीच्या धामधुमीत झालेल्या या अनपेक्षित भेटीमुळे राज्याच्या राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आले आहे. या भेटीविषयी शरद पवार यांनी समाजमाध्यमांवरून माहिती दिली. आपल्या पोस्टमध्ये ते म्हणाले की, 'राज्याचे माजी



गृहमंत्री व आमदार दिलीप वळसे-पाटील यांनी मुंबई येथील सिल्व्हर ओक या माझ्या निवासस्थानी भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी राज्यातील ज्वलंत कांदा प्रश्न, सहकार क्षेत्र व सहकारी संस्थांशी निगडीत विविध विषय, त्याचप्रमाणे रयत शिक्षण संस्थेच्या संदर्भातील वेगवेगळ्या मुद्द्यांवरती सखोल चर्चा केली.' अजित पवार गटाच्या ज्येष्ठ नेत्यांनी शरद पवारांची भेट घेण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी १२ मे रोजी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही 'सिल्व्हर ओक'वर जाऊन शरद पवारांची भेट घेतली होती.




# महायुतीत समन्वयातून निवडणूक लढवणार : मंत्री उदय सामंत

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नागपूर** – आगामी निवडणूक महायुतीने एकत्रितपणे आणि समन्वयातून लढवण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भाजप तसेच राष्ट्रवादीतील काही इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले असले, तरी महायुतीविरोधात ज्या ठिकाणी अन्य समाजातील उमेदवारांनी अर्ज भरले आहेत, ते अर्ज मागे घेण्यासाठी वरिष्ठ नेत्यांमार्फत प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही याबाबत स्पष्ट सूचना दिल्याचे सामंत यांनी नमूद केले. गोकुळ गीते प्रकरणावर बोलताना सामंत म्हणाले की, गीते बंधूंच्या विषयात मंत्री गिरीश महाजन पुढाकार घेत असून त्यांच्यावर सर्वांचा विश्वास आहे. समन्वयातून चर्चा करून योग्य तो मार्ग काढला जाईल आणि त्यामुळे नरेंद्र दराडे यांचा विजय निश्चित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महायुतीतील कोणताही नेता नाराज नसल्याचा दावा करत सामंत यांनी सांगितले की, तिन्ही पक्षांच्या नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली असून निवडणूक एकत्रितपणे लढवण्याचे ठरले आहे. सुहास कांदे नाराज नसून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य असल्याचेही त्यांनी नमूद केले. गीते बंधूंचा प्रश्नही गिरीश महाजन सोडवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, गणेश गीते यांची आपण भेट घेणार असल्याचे सांगत सामंत म्हणाले की, ते सध्या मुंबईत आहेत आणि गिरीश महाजन यांनी त्यांना मुख्यमंत्री यांच्या भेटीसाठी नेल्याची माहिती आहे. ठाकरे गटावर टीका करताना सामंत म्हणाले की, संजय राऊत सातत्याने शिंदे यांच्यावर टीका करत आहेत. मात्र शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादीची मते एकत्र आल्यास महायुतीचा विजय निश्चित असल्याचा दावा त्यांनी केला. छगन भुजबळ यांच्याबाबत विचारलेल्या प्रश्नावर सामंत म्हणाले की, राजकारण प्रत्येक ठिकाणी वेगळे असते.

## चांदस वाठोडा येथील पियुष लोखंडे याची
# भारतीय सैन्य दलामध्ये निवड : सर्वत्र कौतुक

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**चांदस वाठोडा** – येथील पियुष लोखंडे या मुलाची भारतीय सैन्य दलामध्ये निवड झाली असुन त्याने अत्यंत प्रतिकुल परिस्थिती मधुन आपले ध्येय साध्य केले.

पियुष लोखंडे हा आर.जी.देशमुख कृषी विद्यालय, वाठोडा येथील विद्यार्थी असुन कोणाचे ही मार्गदर्शन नसतांना लहानपणीच मुलाची छत्र हरवले आणि बालपणापासुन वच्छला तायवाडे यांनी पालन पोषण केले. मुलाची जिद्द चिकाटी पाहुन आजी अशिक्षित असून नातु नोकरीवर लागला पाहिजे, हे स्वप्न पाहत होती. ते स्वप्न साकार करून त्याची भारतीय सैन्यामध्ये निवड झाली.

सर्वत्र त्यांचा या कामगिरीचे कौतुक होत आहे. त्याचे प्रोत्साहन वाढविण्यासाठी व अभिनंदन करण्यासाठी त्याच्या घरी सदिच्छा भेट देण्यात आली व भावी भविष्याकरीता मार्गदर्शन करून त्याचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी आरोग्य कर्मचारी संजय तायवाडे, सुनिल तायवाडे, राहुल लांडगे, दिनेश काटे, वरुड व परिसरातील महिला सुद्धा उपस्थित होत्या.

# ८००० रुपयात हाड जोडले, बाकी पैसे न मिळाल्याने डॉक्टरने पुन्हा तोडले

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुझफ्फरनगर** – उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर येथून एक धक्कादायक घटना समोर आली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात रेश्मा नावाची एक विधवा महिला आपल्या १४ वर्षीय मानसिक रुग्ण असलेल्या मुलीसह न्याय मागण्यासाठी पोहोचली. या महिलेने जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांवर बेकायदेशीर पैसे उकळणे तसेच निष्काळजीपणामुळे मुलीच्या पायाला गंभीर इजा झाल्याचे गंभीर आरोप केले आहेत.

पीडित महिला रेश्मा यांच्या म्हणण्यानुसार, सुमारे दीड महिन्यापूर्वी त्यांच्या मुलीच्या उजव्या पायावरील हाडाच्या दुखापतीवर जिल्हा रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली होती. या उपचारासाठी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी सुरुवातीला २५ हजार रुपयांची मागणी केली.

# पुणेच्या ११ वर्षीय सुरभी ढगे हिचे मुखोद्गत पारायणाणे उपस्थित श्री गजानन भक्त झाले मंत्रमुग्ध

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)







**शेंदुरजनाघाट** – श्री हनुमान मंदिर वाई रोड मलकापूर येथील श्री संत गजानन महाराज मंदिर व श्री संत गजानन महाराज भक्त परिवार शेंदुरजनाघाट द्वारा आयोजित ज्येष्ठ अधिक मासानिमित्त श्री केदारेश्वर देवस्थान येथे सामुहिक मुखोद्गत महापारायण संपन्न झाले.

या पारायणाच्या सुरवातीला सकाळी ६ वाजता श्री च्या मुखवटच्याचा अभिषेक करुण्यात आला. त्यानंतर पारायण वाचक ११ वर्षीय सुरभी ढगे यांची सकाळी ७ वाजता शिक्षक कॉलनी येथील प्रा.राजु सरोदे यांच्या निवासस्थानातुन रथामध्ये श्री दत्त महाराज दिंडीच्या व महिला मंडळाच्या सेवेतुन गण गणात बोते च्या गजरात पारायण स्थळी श्री केदारेश्वर देवस्थान पर्यंत मिरवणुक काढण्यात आले. त्यानंतर पारायण स्थळी पारायण वाचक सुरभी ढगे हिचे स्वागत करण्यात आले व सकाळी ८ ला पारायणाचे वाचन श्री गजानन महाराजांच्या अद्भुत अलौकिक कृपा आशीर्वादाने पुलकित असलेली मुखोद्गत व्यासपीठ वाचक सुरभी ढगे यांच्या मधुर वाणीतुन श्री विजय ग्रंथ पारायणाच्या २१ अध्यायाचे मुखोद्गत पारायण करण्यात आले.

यावेळी ३०० च्या वर महिला, पुरुष, गजानन भक्तांनी या पारायण सोहळ्याचा लाभ घेतला. अवघ्या ११ वर्षाच्या सुरभीचे मुखोद्गत पारायण ऐकुण उपस्थित नागरिक मंत्रमुग्ध झाले होते. शेंदुरजनाघाट नगरीत जणु शेगाव अवतरल्याचा भास यावेळी होत होता. पारायण संपल्यानंतर श्री ची आरती व त्यानंतर उपस्थित गजानन भक्तांसह परिसरातील नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाकरीता शेंदुरजनाघाट येथील श्री गजानन महाराज भक्त परिवाराने परिश्रम घेतले.

# अनिकेत तटकरेंचा विधान परिषदेचा मार्ग मोकळा : एकनाथ शिंदेंच्या मध्यस्थीनंतर आमदार कन्येचा अर्ज मागे

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पेण** – कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत महायुतीतील उमेदवारीवरून निर्माण झालेला तिढा अखेर मिटल्याचे चित्र आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मध्यस्थीनंतर अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांच्या कन्या जुईली दळवी यांनी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेतला असून राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार अनिकेत तटकरे यांचा विजयाचा मार्ग अधिक सुकर झाला आहे. कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठी महायुतीकडून अनिकेत तटकरे यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आधीपासूनच व्यक्त होत होती. मात्र शिवसेनेचे नेते तथा मंत्री भरत गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले यांनीही निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केल्याने राजकीय चर्चांना उधाण आले होते. त्याचवेळी जुईली दळवी यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून महायुतीतील अस्वस्थता उघड केली होती. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर जुईली दळवी यांनी आपण अर्ज मागे घेणार नसल्याची भूमिका घेतली होती. तसेच आमदार महेंद्र दळवी यांनीही राष्ट्रवादी काँग्रेस आणि खासदार सुनील तटकरे यांच्यावर टीका करत कोकणातील पालकमंत्रीपदावर शिवसेनेचा दावा असल्याचे म्हटले होते. त्यामुळे महायुतीत अंतर्गत मतभेद असल्याची चर्चा रंगली होती.

# संत तुकाराम महाराजांची पालखी २४ जुलैला पंढरपुरात

## आषाढी वारीसाठी ७ जुलैला देहूतून प्रस्थान

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)






**पुणे** – आषाढी पायी वारीसाठी संत तुकाराम महाराज यांची पालखी ७ जुलै रोजी देहू येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. १८ दिवसांचा प्रवास पूर्ण करून पालखी सोहळा २४ जुलै रोजी पंढरपूर येथे दाखल होणार असून यंदा या पालखी सोहळ्याचे ३४१ वे वर्ष आहे. याबाबतची माहिती श्री संत तुकाराम महाराज संस्थान यांनी दिली.

पालखीचे प्रस्थान ७ जुलै रोजी होणार असून पहिला मुक्काम देहू येथील इनामदार वाड्यात असेल. ८ जुलै रोजी पालखी इनामदार वाड्यातून प्रस्थान केल्यानंतर पहिल्या अभंग आरतीसाठी अनगडशहा बाबा दर्गा परिसरात, तर दुसऱ्या अभंग आरतीसाठी चिंचोली येथील पादुका मंदिरात थांबेल. त्यानंतर संध्याकाळी आकुर्डी येथील श्री विठ्ठल मंदिरात पालखीचा मुक्काम असेल.

यानंतर ९ व १० जुलै रोजी पुण्यातील नाना पेठ येथे मुक्काम होणार आहे. ११ जुलै रोजी लोणी काळभोर, १२ जुलै रोजी यवत, १३ जुलै रोजी वरवंड, १४ जुलै रोजी उंडवडी गवळ्याची आणि १५ जुलै रोजी बारामती येथील शारदा प्रांगणात पालखी मुक्कामी असेल.

१६ जुलै रोजी काटेवाडी येथे मेंढ्याचे रिंगण पार पडून सणसर पालखी तळावर मुक्काम होईल. १७ जुलै रोजी बेलवाडी येथे पहिले गोल रिंगण झाल्यानंतर पालखी निमगाव केतकी येथे मुक्कामी असेल. १८ जुलै रोजी इंदापूर येथे दुसरे गोल रिंगण होऊन पालखी तळावर मुक्काम होईल. १९ जुलै रोजी सराटी, २० जुलै रोजी निरा स्नानानंतर अकलूज माने येथे तिसरे गोल रिंगण पार पडेल आणि पालखी तळावर मुक्काम असेल.

२१ जुलै रोजी माळीनगर येथे पहिले उभे रिंगण झाल्यानंतर बोरगाव येथे मुक्काम होईल. २२ जुलै रोजी पिराची कुरोली, तर २३ जुलै रोजी बाजीराव विहीर येथे दुसरे उभे रिंगण पार पडून वाखरी पालखी तळावर मुक्काम असेल. २४ जुलै रोजी पादुकांजवळ आरती आणि तिसरे उभे रिंगण झाल्यानंतर पालखीचे पंढरपूर येथे आगमन होईल. पालखीचा परतीचा प्रवास आषाढी एकादशीनंतर पालखी २८ जुलैपर्यंत पंढरपुरात विसावेल. त्यानंतर २९ जुलै रोजी वाखरी, ३० जुलै रोजी म्हाळुंगे माकडाचे येथील श्री विठ्ठल मंदिर, ३१ जुलै रोजी वडापुरी, १ ऑगस्ट रोजी लासुर्णे, २ ऑगस्ट रोजी बऱ्हाणपूर, ३ ऑगस्ट रोजी हिंगणीगाडा, ४ ऑगस्ट रोजी वरवंड, ५ ऑगस्ट रोजी कुंजीरवाडी फाटा, ६ व ७ ऑगस्ट रोजी पुण्यातील नवी पेठ, ८ ऑगस्ट रोजी पिंपरीगाव येथे मुक्काम करीत ९ ऑगस्ट रोजी पालखी सो-हळा पुन्हा देहूत दाखल होणार आहे.

# शेतकऱ्यांना प्रति हेक्टर एक लक्ष रुपये मदत द्या

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

## तहसिलदार यांचे कक्षात शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन



**वरुड** – तहसिलदार यांचे कक्षात शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन करुन वरुड तालुका गारपीट ग्रस्त घोषित करुन शेतकऱ्यांना प्रति हेक्टर एक लक्ष रुपये मदत द्या, अशी मागणी करणारे निवेदन किसान न्याय हक्क संघर्ष समिती व शेतकऱ्यांचे वतीने तहसिदारांना देण्यात आले आहे.

तालुक्यात ३० व ३१ मे ला संपुर्ण तालुक्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व गारपीट झाले असून त्यामुळे शेतकऱ्यांचे संत्रा व मोसंबी पिकाचे खुप मोठे नुकसान झाले असून शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले.

या वर्षीचे एप्रिल व मे महिन्यात तापमान ४५ ते ४७ डिग्री अंश वर गेल्याने फार मोठा प्रमाण शेतकऱ्यांची संत्रा मोसंबी या फळाची फळ गळ झाली व आता गारपीट झाले. त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात फळ गळ होऊन शेतकऱ्यांचे बागेतील फळ खाली आले असून आता शेतकऱ्यांचे हाती काहीच उरले नाही. शेतकऱ्यांनी आंबिया बहार संत्रा मोसंबीचे उत्पादन घेतांना जवळ असलेला पैसे सर्व खर्च होऊन आता पुढे उत्पादन घेणेकरीता शेतकरी अडचणीत आला असून आता शेतकऱ्यांना शासना कडुन आर्थिक मदतीची आवश्यकता आहे.

शासनाने शेतकऱ्यांना प्रति हेक्टर एक लक्ष रुपये तत्काळ मदत द्यावी, असे निवेदन किसान न्याय हक्क संघर्ष समिती व सर्व शेतकऱ्यांचे तहसिदार यांचे कक्षात ठिय्या आंदोलन झाले.

तहसिलदार यांनी शेतकऱ्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठुन वरुड तालुक्यातील शेतकऱ्यांचे नुकसानबाबत कळुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई कशी मिळेल, या बाबत पाठ पुरावा करु, असे सांगितले. या निवेदनावर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न मिळाल्यास जण आंदोलन करु, असा इशारा किसान न्याय हक्क संघर्ष समिती व शेतकऱ्यांनी दिला.

या ठिय्या आंदोलनात कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र उर्फ बबलु पावडे, उपसभापती बाबाराव मांगुळकर, माजी संचालक सुधाकर दोड, खरेदी विक्री संघ संचालक गणेश खरडे, माजी नगरसेवक धनंजय बोकडे, किसान न्याय हक्क संघर्ष समितीचे स्वप्नील खांडेकर, राजेश डवरे, देवेंद्र शेडके, चंद्रकांत बोंडनासे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक हिरकांत उईके, मनीष धोटे अंकुश बोडनासे, दीपक देशमुख, श्रीकृष्ण पाटील, श्रीराम बहुरुपी, सुधाकर टेकोडे, सुरेश राऊत, चेतन ठाकरे, सर्वेश ताथवडे, शुभम ठाकरे, मनोज इंगोले, वैभव पोतदार, हर्षल बहुरुपी, राजु भोरे उपस्थित होते.

## संपादकीय

**{ यश एका दिवसात मिळत नाही, त्यासाठी सतत प्रयत्न करावे लागतात. }**

## महासत्तेच्या दिशेने डिजिटल पाऊल - 'जनगणना २०२६'

प्रारंभ एका नव्या पर्वाचा! 'देशाचे अचूक नियोजन आणि लोककल्याणकारी धोरणांची आखणी ही केवळ आकडेवारीवर अवलंबून नसते, तर ती आकडेवारी किती सत्य आणि अद्ययावत आहे यावर देशाचे भवितव्य ठरते. २०२६ ची राष्ट्रीय जनगणना हे केवळ नागरिकांची डोकी मोजण्याचे साधन नसून, ती आधुनिक भारताच्या प्रगतीचा पाया रचणारी एक ऐतिहासिक प्रक्रिया आहे.' दीर्घ प्रतीक्षेनंतर अखेर भारतातील राष्ट्रीय जनगणनेचा बिगुल वाजला आहे. दर दहा वर्षांनी होणारी ही प्रक्रिया २०२१ मध्ये कोरोना महामारीच्या जागतिक संकटामुळे रखडली होती. मात्र, आता २०२६ मध्ये जेव्हा या प्रक्रियेला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे, तेव्हा तिचे स्वरूप पूर्वीपेक्षा पूर्णपणे भिन्न, आधुनिक आणि तंत्रज्ञानाने सुसज्ज असे आहे. स्वातंत्र्यानंतरची ही १६ वी जनगणना असून, भारताच्या इतिहासातील ही पहिली संपूर्णपणे डिजिटल जनगणना ठरत आहे. कागद-पेनाचा पारंपरिक कारभार मागे सारून स्मार्टफोन, मोबाईल ॲप आणि केंद्रीय पोर्टलच्या माध्यमातून देशातील १४० कोटींहून अधिक जनतेची माहिती संकलित केली जात आहे. हे संक्रमण केवळ प्रशासकीय सुलभतेचे नसून, 'डिजिटल इंडिया'च्या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवणारे एक क्रांतीकारी पाऊल आहे. डिजिटल स्वरूप आणि 'स्व-गणना' पॅटर्न या जनगणनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे केंद्र सरकारने नागरिकांना दिलेला 'स्व-गणना' म्हणजेच स्वतःची माहिती स्वतः ऑनलाइन भरण्याचा पर्याय. आतापर्यंत नागरिकांना शासकीय प्रगणक घरी येण्याची आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत तासनतास बसण्याची वाट पहावी लागायची. परंतु, या हायब्रिड मॉडेल अंतर्गत नागरिक घरबसल्या १६ भाषांमध्ये उपलब्ध असलेल्या अधिकृत पोर्टलवर जाऊन आपल्या कुटुंबाची माहिती भरू शकत आहेत. एकूण ३३ प्रश्नांची ही डिजिटल प्रश्नावली अत्यंत सोपी असून, त्यात घराचे स्वरूप, पिण्याचे पाणी, मुख्य आहार, उपलब्ध सुविधा आणि देशात पहिल्यांदाच समाविष्ट केली जाणारी जातीनिहाय आकडेवारी यांसारख्या मुद्द्यांचा समावेश आहे. माहिती ऑनलाइन भरल्यानंतर मिळणारा ११ अंकी 'डए खऊं जेव्हा घरी येणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याला दाखवला जाईल, तेव्हा केवळ 'क्रॉस-चेक' करून ही प्रक्रिया अवघ्या काही मिनिटांत पूर्ण होईल. यामुळे शासकीय यंत्रणेवरील ताण प्रचंड प्रमाणात कमी होणार असून, वेळ आणि पैशांची मोठी बचत होणार आहे.

# नव्या मध्यपूर्वेची निर्मिती

**मध्यपूर्वेतील संघर्षांचा इतिहास पाहिल्यास या प्रदेशात युद्धे केवळ सीमांसाठी होत नाहीत, तर धर्म, इतिहास, अस्तित्व आणि सामर्थ्य यांच्या संघर्षातून जन्म घेतात, असे दिसते. आज 'ग्रेटर इस्रायल' या संकल्पनेभोवती सुरू असलेली चर्चादेखील याच व्यापक संदर्भात समजून घ्यावी लागते. कारण हा प्रश्न फक्त इस्रायलने किती जमीन ताब्यात घेतली यापुरता मर्यादित नसून संपूर्ण मध्यपूर्वेच्या राजकीय पुनर्रचनेशी जोडलेला आहे.**




७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने केलेल्या हल्ल्यानंतर इस्रायलच्या प्रत्युत्तराने दोन गोष्टी स्पष्ट झाल्या. पहिली म्हणजे इस्रायल आता केवळ प्रतिकारात्मक संरक्षण या चौकटीत विचार करत नाही. दुसरी म्हणजे त्याने स्वतःच्या सुरक्षिततेची व्याख्या अधिक व्यापक केली आहे.

इस्रायलसाठी सीमा आता केवळ नकाशावरील रेषा नसून, संभाव्य धोक्यांपासून दूर ठेवलेले एक विस्तारित सुरक्षा-क्षेत्र बनले आहे. ही भूमिका अचानक निर्माण झालेली नाही; तिची मुळे १९४८ मधील इस्रायलच्या स्थापनेपासून सुरू होणाऱ्या संघर्षमय इतिहासात आहेत. त्यानंतरचे १९६७ चे सहा दिवसांचे युद्ध, १९७३ चे योम किप्पूर युद्ध, लेबनॉनमधील संघर्ष आणि पॅलेस्टिनी उठाव यांनी इस्रायली समाजाच्या मानसिकतेवर खोल परिणाम केला.

यातून आपण वेढलेलो आहोत ही भावना त्यांच्या राजकीय विचारसरणीचा मध्यवर्ती भाग बनली. त्यामुळे इस्रायलमध्ये सुरक्षा ही संकल्पना केवळ सीमांच्या संरक्षणापुरती मर्यादित न राहता, संभाव्य शत्रूंची क्षमता रोखणे किंवा निष्प्रभ करणे अशी व्यापक झाली. याच पार्श्वभूमीवर गाझातील हमास, लेबनॉनमधील हिज्बुल्लाह किंवा सीरियातील इराणसमर्थित गट यांना इस्रायल केवळ शेजारील घटक म्हणून न पाहता, भविष्यातील अस्तित्वाला धोका मानतो.

या संदर्भात ग्रेटर इस्रायल ही संकल्पना केवळ धार्मिक राष्ट्रवादाशी संबंधित नसून, सुरक्षा, भू-राजकीय प्रभाव, जलसंपदा, व्यापारमार्ग आणि लोकसंख्या-संतुलन यांसारख्या व्यापक घटकांशीही जोडलेली आहे. दक्षिण लेबनॉनमधील लितानी नदी परिसर आणि गोलन टेकड्या हे केवळ लष्करीदृष्ट्या नव्हे तर जलस्रोत व भौगोलिक नियंत्रणाच्या दृष्टीनेही अत्यंत संवेदनशील भाग आहेत. इस्रायलने १९६७ मध्ये सीरियाकडून गोलन टेकड्या ताब्यात घेतल्या आणि आजही त्यावर नियंत्रण राखले आहे, कारण या उंच भूभागामुळे उत्तरेकडील इस्रायलवर रणनीतिक नजर ठेवता येते. या पार्श्वभूमीवर 'ग्रेटर इस्रायल' ही संकल्पना काही वेळा धार्मिक कल्पनेपलीकडे जाऊन आधुनिक भू-राजकारणाशी जोडली जाते, त्यामुळे ती अधिक वादग्रस्त आणि संवेदनशील ठरते. आज इस्रायलमध्ये पॅलेस्टिनी प्रश्नाबाबत दोन प्रमुख दृष्टिकोन दिसतात.

एक गट दोन स्वतंत्र राष्ट्रांच्या उपायाला पाठिंबा देतो, तर दुसरा गट पॅलेस्टिनी राष्ट्राच्या कल्पनेलाच सुरक्षा धोक्याचे कारण मानतो. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या सरकारवर दुसऱ्या दृष्टिकोनाचा प्रभाव असल्याचे काही विश्लेषकांचे मत आहे. वेस्ट बँकमधील इस्रायली वसाहतींचा विस्तार हा या धोरणाचा महत्त्वाचा भाग मानला जातो. आंतरराष्ट्रीय समुदाय या वसाहतींना बेकायदेशीर मानतो, तरीही पायाभूत सुविधा आणि सुरक्षा व्यवस्थेद्वारे त्या भागात इस्रायली नियंत्रण वाढत असल्याचे दिसते. या घडामोडींमुळे दोन राष्ट्रांच्या उपायाची शक्यता कमी होत असल्याची चिंता व्यक्त केली जाते.

अशी परिस्थिती कायम राहिल्यास पॅलेस्टिनी समाजात असंतोष आणि कट्टरतेला चालना मिळण्याचा धोका काही विश्लेषकांकडून व्यक्त केला जातो. गाझातील युद्धामुळे तरुण पिढीत असंतोष, असुरक्षितता आणि संताप वाढत आहे. यामुळे काही ठिकाणी अतिरेकी विचारधारांना समर्थन मिळण्याचा धोका वाढतो. याचा परिणाम संपूर्ण अरब जगतात दिसू शकतो, कारण काही अरब देशांनी जसे यूएइ, बहरीन, मोरोक्को इस्रायलसोबत संबंध सुधारले असले तरी गाझा संघर्षामुळे हे संबंध पुन्हा तणावात येऊ शकतात. अरब सरकारे अमेरिका व इस्रायलसोबतचे संबंध आणि जनतेतील पॅलेस्टिनी समर्थन यामध्ये अडकलेली आहेत. त्यामुळे अंतर्गत दबाव वाढण्याची शक्यता आहे. 'ग्रेटर इस्रायल' या चर्चेचा एक मानवी पैलूही आहे, जो अनेकदा दुर्लक्षित राहतो. युद्धाच्या नकाशांमध्ये दिसणारे भूभाग हे प्रत्यक्षात लाखो लोकांचे जीवन असते. गाझामधील उद्ध्वस्त शहरे, लेबनॉनमधील विस्थापित कुटुंबे, सीरियातील अस्थिरता या सगळ्यांच्या केंद्रस्थानी सामान्य नागरिक आहेत. प्रत्येक लष्करी कारवाई नवीन जखमा निर्माण करते. इतिहास सांगतो, की लष्करी विजय कायमस्वरूपी राजकीय समाधान देत नाही. अमेरिकेने अफगाणिस्तान आणि इराकमध्ये हे अनुभवले. रशियाला युक्रेनमध्ये त्याचा अनुभव येत आहे आणि इस्रायललाही कदाचित हे वास्तव स्वीकारावे लागेल की केवळ शक्तीच्या आधारे दीर्घकालीन शांतता निर्माण होत नाही.

इस्रायलची सध्याची धोरणात्मक दिशा अल्पकालीन सुरक्षिततेसाठी उपयुक्त ठरू शकते, पण दीर्घकालीन स्थैर्य देईल का, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. कोणतेही राष्ट्र केवळ लष्करी ताकद, सीमा नियंत्रण किंवा बफर झोनवर टिकत नाही; त्यासाठी शेजारी देशांशी सहअस्तित्व आणि परस्पर विश्वास आवश्यक असतो-जो सध्या मध्यपूर्वेत अत्यंत दुर्मीळ आहे. 'ग्रेटर इस्रायल' ही संकल्पना वेगवेगळ्या गटांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे मांडली जाते. काही ज्यू राष्ट्रवादी विचारांनुसार बायबलमध्ये उल्लेख केलेल्या ऐतिहासिक भूमीपर्यंत इस्रायलचा प्रभाव वाढावा, अशी कल्पना आहे. यात वेस्ट बँक, गाझा, गोलन टेकड्या, दक्षिण लेबनॉन आणि काही अतिरेकी व्याख्यांमध्ये जॉर्डनचा काही भागही येतो. मात्र हे इस्रायलचे अधिकृत धोरण नाही. अलीकडच्या वर्षांत वेस्ट बँकमधील वसाहती विस्तार, गाझामधील युद्ध आणि सीमाभागातील लष्करी कारवाया यामुळे या चर्चेला पुन्हा जोर मिळाला आहे.

इस्रायलने या कारवायांचे कारण नेहमीच सुरक्षा असे दिले आहे, पण त्यामुळे हे धोरण फक्त संरक्षणात्मक आहे की त्यात भू-राजकीय विस्ताराचे घटक आहेत, असा प्रश्न उपस्थित होतो. गाझामधील संघर्षामुळे मोठ्या प्रमाणावर विध्वंस आणि विस्थापन झाले असून, आंतरराष्ट्रीय स्तरावर तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली आहे. इस्रायलने मात्र या कारवाया हमासविरोधातील आवश्यक पाऊल असल्याचे म्हटले आहे. दक्षिण लेबनॉनमधील परिस्थितीही तितकीच गंभीर आहे. 'हिज्बुल्लाह' आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष हा अनेक दशकांपासून सुरू आहे; मात्र २०२३ नंतर या संघर्षाची तीव्रता अधिक वाढली. इस्रायली सैन्याने सीमापार कारवाया वाढवल्या आणि अनेक किलोमीटर आतपर्यंत लष्करी उपस्थिती निर्माण केली. इस्रायल याला 'सुरक्षा पट्टा' म्हणत असला, तरी अरब देश आणि विश्लेषकांच्या मते हे दीर्घकालीन नियंत्रणाचे संकेत आहेत. सीरियामध्येही तिथल्या अस्थिरतेचा फायदा इस्रायल घेत असल्याचा आरोप होतो. बशहर-अल-आसाद यांच्या सरकारची पकड कमकुवत झाल्यानंतर इस्रायलने गोलान टेकड्यांपलीकडेही आपली कारवाई वाढवली. इस्रायलचा दावा असा, की इराणसमर्थित गट आणि शस्त्रसाठे रोखण्यासाठी हे आवश्यक आहे; परंतु 'सुरक्षा' या नावाखाली इस्रायल आपल्या प्रभावक्षेत्राचा विस्तार तर करत नाही ना, असा प्रश्न उपस्थित होतो. या सर्व घटनांमुळे 'ग्रेटर इस्रायल' ही संकल्पना आता केवळ कट्टर राष्ट्रवादी घोषणांपुरती राहिलेली नाही, तर प्रत्यक्ष धोरणात्मक शक्यता वाटू लागली आहे.

# शेतमालाची बाजारपेठ भाजपच्या ताब्यात!

पणन मंडळाचे संचालक मंडळ बाजारांबाबत केवळ धोरणात्मक निर्णय घेऊ शकत होते. आता पणनमंत्री थेट बाजाराचे अध्यक्ष झाल्यामुळे तिथला कर्मचारीवर्ग, व्यापारी, बाजारातील गाळे, त्याचे वाटप, रोजच्या शेतमाल विक्रीबाबतचे नियमन, नियंत्रण त्यांच्याकडे आले आहे.



लोकांना रोज लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंचे म्हणजेच शेतमाल विक्री आणि खरेदीचे व्यवस्थापन करणाऱ्या बाजार समित्या 'राष्ट्रीय महत्त्वाचे बाजार' या योजनेखाली स्वतंत्रपणे नियंत्रित व विकसित करण्याचे धोरण केंद्र सरकारने ठरविले. त्यासाठी त्यांनी एक आदर्श कायदा बनविला व तो राज्य सरकारांना पाठविला.

ज्या बाजारपेठांत वर्षाला ८० हजार मेट्रीक टन उलाढाल होते आणि जिथे किमान दोन राज्यांतून शेतमाल विक्रीसाठी येतो त्या बाजारांचे व्यवस्थापन शेतकऱ्यांमधून निवडल्या जाणाऱ्या संचालक मंडळाकडून न करता ते थेट राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली आणले गेले आहे. महाराष्ट्रात या निकषात १३ बाजारपेठा येतात. या सर्व बाजारपेठा थेट सरकारच्या नियंत्रणाखाली आणत त्याचे अध्यक्षपद पणनमंत्री यांच्याकडे सोपविण्याचे सरकारने ठरविले. त्याची सुरुवात देशातील एक अग्रगण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी-नवी मुंबई) येथे झाली. पणनमंत्री जयकुमार रावल हे त्याचे अध्यक्ष बनले.

आता ते नागपूर या दुसऱ्या महत्त्वाच्या बाजार समितीचे अध्यक्ष होतील. पुढे पुणे, सोला-पूर, लातूर हे बाजार त्यांच्या अंकित येतील. सरकारने ठरविले तर सर्व १३ प्रमुख बाजारपेठा भाजपचे मंत्री असलेल्या रावल यांच्या ताब्यात येतील. त्यात हिंगणघाट, कोल्हापूर, सांगली, तासगाव, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि जालना यांचा समावेश आहे. दुसऱ्या अर्थाने इथे शेतमाल विक्रीसाठी आणणारे सर्व शेतकरी थेट त्यांच्या अंकित येतील.

आता यात राजकीय अर्थही काढले जातील. कारण शेतमालाची बाजारपेठ हा अत्यंत संवेदनशील विषय असून शेतीच्या समस्यांचे फार मोठे उत्तर येथेच दडले आहे. उन्हा-पावसात राब राबून शेतकरी आपला शेतमाल बाजारपेठेत आणतो. त्याला उत्तम दर मिळाला तर त्याच्या वर्ष-सहा महिन्यांच्या कष्टाचे चीज होते व त्यात तो संसाराचा गाडा हाकतो. इथे मातीमोल भाव मिळाला तर त्याचे संपूर्ण गणित बिघडते हे वेगळे सांगायला नको. हे बिघडलेले गणित राजकीय फेरमांडणी करण्यास भाग पाडते आणि ठराविक कालावधीनंतर शेतकऱ्यांना पॅकेज द्यावे लागते.

मंगळवारी भाजप-प्रणित महायुतीचे सरकार सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना सुमारे ३६ हजार ५८५ कोटींची कर्जमाफी देण्याचा निर्णय घेत असतानाच भाजपचे मंत्री मुंबई बाजारसमितीचे अध्यक्षपद स्वीकारतात हा एक योगायोगच म्हणावा लागेल. मुंबई बाजारसमिती भाजपच्या ताब्यात कधीच नव्हती. तिकडे कोल्हा-पूरला गोकुळ हा अत्यंत लोकप्रिय ब्रँड चालविणारा दूध संघ ताब्यात घेत असतानाच राज्यातल्या अत्यंत महत्त्वाच्या बाजारपेठा भाजपकडे जात आहेत. मुंबई बाजारसमितीवर परंपरेने काँग्रेस व राष्ट्रवादीचे वर्चस्व होते. अत्यंत शक्तीशाली असे संचालक मंडळ रोज कोट्यवधीची उलाढाल नियंत्रित करत होते.

तिकडे नागपूरला काँग्रेसचे वर्चस्व होते ते ही गेले. पुणे बाजारसमिती दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताब्यात होती. ते हयात होते तोवर त्यांनी राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार या नव्या संकल्पनेत पुण्याचा समावेश करायचा नाही म्हणून विषय थांबवून ठेवला होता. आता ते हयात नाहीत. याशिवाय सोलापूर व लातूर या महत्त्वाच्या बाजारपेठा काँग्रेसच्या वर्चस्वाखाली आहेत. त्यासुद्धा लवकरच रावल यांच्या रूपाने भाजपचे नेतृत्व स्वीकारतील. काँग्रेस व राष्ट्रवादीच्या काही नेत्यांनी महायुतीसोबतचे वैयक्तिक व राजकीय संबंध फार माधुर्याने जपले आहेत. ते ही हे बदल फार काळ थांबवू शकणार नाहीत, अशी स्थिती आहे. शेतमालाच्या बाजारपेठा कोणी कितीही नाकारले तरी मतदार शेतकरी व त्यामागची प्रचंड आर्थिक उलाढाल याचे केंद्रबिंदू आहेत हे वास्तव आहे. एकट्या मुंबई बाजारपेठेत २०२४-२५ मध्ये ३० लाख ७३ हजार १८३ मे. टन शेतमाल विक्रीसाठी आला होता. यात केवळ अन्न-धान्य नव्हे तर सुका-मेवा, फळे, भाजीपाला व इतर शेतमालही होता. पुण्यात हाच आकडा १४ लाख मे.टन, सोलापूर ८.३८ लाख मे.टन, नागपूर ४.५९ लाख मे.टन आणि लातूर ४.१४ लाख मे.टन होता.

## राशीभविष्य

**मेश :** कामाच्या ठिकाणी तुमच्या कष्टांचे फळ मिळेल. नवे सहकारी मदत करतील. आर्थिक लाभ होऊ शकतो.

**वृष्णभ :** कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. प्रलंबित कामे पूर्ण होतील. संयमाने निर्णय घ्या.

**मिथुन :** मित्रांसोबत चांगला वेळ जाईल. एखादी आनंदाची बातमी मिळेल. आरोग्याची काळजी घ्या.

**कर्क :** नवी ओळख फायदेशीर ठरेल. कामात यश मिळेल. गुंतवणूक करताना विचार करा.

**सिंह :** नेतृत्व करण्याची संधी मिळेल. स्वतःच्या कल्पनांवर काम करा. मान-सन्मान मिळेल.

**कन्या :** नियोजनपूर्वक काम केल्यास यश मिळेल. जुन्या मित्रांशी भेट होईल. नवीन खरेदीचे योग आहेत.

**तुला :** कलाक्षेत्रात प्रगती होईल. मन प्रसन्न राहील. कोणालाही उधारी देणे टाळा.

**वृश्चिक :** गुंतागुंतीचे प्रश्न सुटतील. धैर्याने काम करा. अचानक लाभ होण्याची शक्यता आहे.

**धनु :** प्रवास सुखकर होईल. नवे अनुभव मिळतील. कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधा.

**मकर :** कामाचे ओझे वाढू शकते. तरीही तुम्ही ते सांभाळाल. वरिष्ठांची शाबासकी मिळेल.

**कुंभ :** नवीन शिकायला मिळेल. आत्मविश्वासाने पुढे जा. कोणाच्याही वादात पडू नका.

**मीन :** तुमची कल्पनाशक्ती कामात मदत करेल. एखादी प्रिय व्यक्ती मदत करेल. खर्चावर नियंत्रण ठेवा.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# ‘भंडारा म्हणजे शुद्ध हळद’ म्हणून जाहीर करा : भाजप आमदाराची एफडीएकडे मागणी

## तुकाराम मुंढेंनी दिलं मोठं आश्वासन

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्रातील तमाम जनतेचे श्रद्धास्थान असलेल्या जेजुरी गडासह राज्यातील विविध प्रमुख देवस्थानांच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भेसळयुक्त आणि केमिकलयुक्त भंडाऱ्याची विक्री होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या गंभीर समस्येकडे आणि भाविकांच्या सुरक्षेकडे लक्ष वेधत भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांची भेट घेऊन त्यांना एक विशेष निवेदन दिले आहे. ‘भंडारा म्हणजे शुद्ध हळद‘ म्हणून जाहीर करा, अशी मागणी आमदार पाचपुते यांनी या निवेदनाद्वारे केली आहे.

सध्या अन्न व औषध प्रशासनाकडे (एफडीए) ’भंडारा’ म्हणजे नेमकं काय, याची कोणतीही ठोस किंवा कायदेशीर व्याख्या स्पष्ट नाही. कायद्यात भंडारा म्हणजे ’हळदच’ असे कुठेही नमूद न केल्याचा गैरफायदा काही ठराविक लोक घेत आहेत.

व्यावसायिक देवस्थान परिसरात रासायनिक रंग आणि ज्वलनशील रसायने मिसळलेल्या भंडाऱ्याची सर्रास विक्री करत आहेत. एफडीएकडे अधिकृत व्याख्या नसल्यामुळे अशा भेसळ करणाऱ्यांवर आणि बनावट भंडारा विक्रेत्यांवर कडक कायदेशीर कारवाई करताना प्रशासनाला तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. केमिकलयुक्त भंडाऱ्यामुळे जिवाला धोका नुकतीच खंडोबाचे मुख्य तीर्थक्षेत्र असलेल्या जेजुरी गडावर भंडाऱ्याला अचानक आग लागल्याची एक अत्यंत खळबळजनक घटना घडली होती. या घटनेचा दाखला देत आमदार पाचपुते यांनी भंडाऱ्यातील रासायनिक भेसळीवर बोट ठेवले. केमिकलयुक्त भंडारा शरीरात गेल्याने भाविकांच्या जिवाला मोठा धोका निर्माण झाला आहे.

‘आमच्या श्रद्धेवर परिणाम होतोय‘ आमदार विक्रम पाचपुते या संपूर्ण प्रकरणावर प्रसारमाध्यमांशी बोलताना आमदार विक्रम पाचपुते म्हणाले की, ‘मी एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंडे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले आहे. अनेक खंडोबाच्या मंदिरात हळदीचा भंडारा म्हणून वापर केला जातो.

# डॉ.ऋतूजा अमित भड यांचे निधन

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – शहरातील मधुरत्न कॉलनी परिसरातील रहिवाशी अमित भड यांच्या अर्ध्यांगिनी डॉ.ऋतूजा अमित भड यांचे वयाच्या अवघ्या ३३ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या गेल्या काही दिवसांपासुन नागपुर येथील खाजगी रुग्णालयामध्ये उपचार घेत होत्या. काल दुपारच्या सुमारास अचानक त्यांची प्रकृती खालावली व त्यांचा मृत्यू झाला.

त्यांच्या पार्थीवावर शहरातील केदारेश्वर मोक्षधाम येथे स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक व शहरवासियांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती अमित, सासु, दिर असा आप्तपरिवार असून त्यांच्या अचानक निधनाने शहरात हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

# कुवेत विमानतळावर झालेल्या इराणी हल्ल्यात भारतीय नागरिक ठार

## ६३ जखमी, अनेकांची प्रकृती गंभीर : ड्रोन हल्ल्यात अमेरिकन बेस सुद्धा टार्गेट

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**कुवेत** – कुवेत आंतरराष्ट्रीय विमानतळावर झालेल्या इराणी ड्रोन हल्ल्यात एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला आणि ६३ जण जखमी झाले. त्यापैकी अनेकांची प्रकृती गंभीर आहे. कुवेतमधील भारतीय दूतावासाने या घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. कुवेतच्या आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार, अनेक जण डोक्याला आणि शरीराला गंभीर जखमा झाल्या आहेत. या घटनेनंतर, घटनास्थळी २५ रुग्णवाहिका पाठवण्यात आल्या आणि जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या हल्ल्यामुळे विमानतळाच्या टर्मिनल १ चे मोठे नुकसान झाले. यानंतर, सुरक्षेच्या कारणास्तव विमानतळावरील वाहतूक तात्पुरती थांबवण्यात आली. यापूर्वी, यूएस सेंट्रल कमांडने (उएछढउजच) माहिती दिली होती की, इराणने कुवेतमध्ये तैनात असलेल्या अमेरिकी सैनिकांवर वारंवार ड्रोन हल्ले केले होते. तथापि, सर्व हल्ले अयशस्वी ठरले.

ट्रम्प यांनी फोनवर नेतान्याहू यांना शिवीगाळ केल्याचे कबूल केले अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी फोनवर बोलताना त्यांना ’वेडा माणूस’ म्हटले होते, हे कबूल केले आहे. तथापि, त्यांनी असेही म्हटले की ते नेतान्याहू यांचा आदर करतात आणि त्यांचे त्यांच्याशी खूप चांगले संबंध आहेत. एका पॉडकास्टमध्ये ट्रम्प म्हणाले, ‘इस्रायलने लेबनॉनवर केलेल्या हल्ल्यामुळे मी नाराज आहे. मला बिबी (नेतान्याहू) खूप आवडतात आणि मी त्यांच्यासोबत खूप चांगल्या प्रकारे काम करतो.

# जनार्दन काळेंचा इच्छा मृत्यू पत्करुन देहदान

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

## धनोडीच्या काळे कुटुंबियांचा समाजासमोर अनोखा आदर्श



**वरुड** – तालुक्यातील धनोडी गावातील रहिवासी जनार्दन काळे ज्यांनी आपल्या मृत्यू नंतर देह दान करण्याचा निर्णय घेतला होता आणि आज तो प्रत्यक्षात त्यांच्या कुटुंबीयांनी पुर्ण केला.

त्यांनी कुटुंबियांना आधीच सांगुन ठेवले होते की, माझा मृत्यू २०२६ मध्ये होईल आणि माझे शरीर तुम्ही देहादान करावे. जनार्दन काळे हे ७५ वर्षाचे झाले व त्यांनी निर्णय घेतला की आता आपला त्रास कुटुंबतील सदस्य ना होऊ नये म्हणुन त्यांनी मागील २० ते २५ दिवसांपासून इच्छा मरण घेण्याचे ठरव्हिल्यानंतर जनार्दन काळे यांनी अन्न आणि पाणी सोड्न दिले होते आणि १ जून २०२६ रोजी दुपारच्या सुमारास त्यांचे रहात्या घरी निधन झाले आणि कुटुंबयांनी त्यांच्या इच्छे प्रमाणे त्यांचे देहदान करुन समाजापुढे एक नवा आदर्श उभा केला आहे. जनार्दन काळे हे शेतकरी होते. ते नेहमी नैसर्गिक शेतीवर भर द्याचे, सोबतच ते पक्षी मित्र होते. त्यांनी पक्षीकरीता घरा समोर व शेतात पक्षांकारीता झाडे लावली होती. ते घेतलेल्या निर्णयावर नेहमी ठाम रहायचे आणि घेतलेला निर्णय पुर्ण करुन दाखवायचे. त्यांनी त्यांच्या मुलींचे लग्न अगदी साध्या पद्धतीने केले असून नेहमी साधं आणि सरळ जीवन जगण्याचा निर्णय घेतला होता. मृत्यू नंतर देहादान करायचे, हा निर्णय त्यांनी स्वतः आधीच घेतला होता आणि त्यासाठी त्यांनी स्वतः ही माहिती जिल्हा रुग्णालयाला दिली होती. जीवनात त्यांनी अगदी साधे सरळ जीवन जगुण नेहमी समाज हिताचे निर्णय घेतले आणि नेहमी ते आपल्या निर्णयावर ठाम रहाले, याचा अभिमान त्यांच्या कुटुंबीयांना आहे व त्याच्या इच्छे प्रमाणेच त्यांच्या परिवाराने त्यांना शेवट पर्यंत साथ दिली आणि त्यांचा शेवटचा सुद्धा निर्णय त्यांनी पुर्ण केला.

जनार्दन काळे यांचे जीवन कार्य जगण्याची शैली आणि इच्छा मरण घेऊन देहादान करण्याचा निर्णयाचे मात्र सर्वत्र सद्या कौतुक केले जात असून याबाबत सर्वत्र चर्चा सुरु आहे.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना : अपात्र लाभार्थ्यांनी लाटले २६ हजार कोटी!

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत अपात्र ठरलेल्या ८१ लाख लाभार्थ्यांनी गेल्या २२ महिन्यांत राज्य सरकारचे जवळपास २६ हजार ७३० कोटी रुपये लाटले आहेत. अपात्र महिलांकडून रक्कम वसूल न करण्याची भूमिका सरकारने घेतली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत अपात्र ठरलेल्या ८१ लाख लाभार्थ्यांनी गेल्या २२ महिन्यांत राज्य सरकारचे जवळपास २६ हजार ७३० कोटी रुपये लाटले आहेत. अपात्र महिलांकडून रक्कम वसूल न करण्याची भूमिका सरकारने घेतली आहे. मात्र, सरकारी यंत्रणेची दिशाभूल करत योजनेचा लाभ घेणाऱ्या १४ हजार पुरुषांकडून लाभ वसूल केला जाणार आहे. हा लाभ कसा वसूल करायचा? असा प्रश्न सरकारसमोर आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी २१ ते ६५ वर्ष वयाच्या आणि वार्षिक अडीच लाख रुपये उत्पन्न असलेल्या महिला पात्र ठरवण्यात आल्या होत्या. या महिलांच्या बँक खात्यात १ जुलै २०२४ पासून महिना १५०० रुपयांचा लाभ जमा करण्यात आला. तिजोरीवर पडणारा आर्थिक ताण लक्षात घेऊन सरकारने लाभार्थ्यांसाठी ई –केवायसी लागू करण्याचा निर्णय घेतला.

त्यामुळे ६५ लाख महिला या योजनेतून बाद झाल्या. तर अडीच लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न आढळून आल्याने साडेनऊ लाख महिलांचा लाभ बंद करण्यात आला.

सुरुवातीला २ कोटी ४७ लाख महिला लाभार्थ्यांनंतर छाननीअंती तीच संख्या आता १ कोटी ६६ लाखावर आली आहे. याचा अर्थ गेल्या २२ महिन्यात ८१ लाख लाभार्थ्यांनी २६ हजार ७३० कोटी रुपयांना शासनाला चुना लावल्याचे स्पष्ट होते. लाडकी बहीण योजनेचे बोगस लाभार्थी अडीच लाखापेक्षा जास्त उत्पन्न असेलेल्या १० लाख महिला सुमारे पाच लाख सरकारी कर्मचारी १४ हजार पुरुष मंडळी.

# बंडखोरी मोडण्यासाठी सर्वच पक्षांची धावपळ : १७ पैकी ६ जागी युतीचे पारडे जड

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी राजकीय रणधुमाळी सुरू झाली असून ’महायुती’ विरुद्ध ’महाविकास आघाडी’ (मविआ) असा थेट सामना रंगला आहे. बंडखोरी मोडून काढण्यासाठी पक्षांतर्गत पातळीवर प्रयत्न सुरू असतानाच, अर्ज छाननी आणि नाट्यमय घडामोडींमुळे ६ महत्त्वाच्या मतदारसंघांमध्ये महायुतीचे पारडे जड झाले असून, येथे त्यांचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत उद्या संपत असली, तरी त्यापूर्वीच सोलापूर, यवतमाळ, अमरावती आणि नाशिकमधील चित्र स्पष्ट झाले आहे. तर कोकणामध्ये महायुतीतील बंडखोर उमेदवार जुईली दळवींनी माघार घेतली आहे.

दळवींच्या कन्येचा अर्ज मागे महायुतीचे नेते आणि मंत्री भरत गोगावले यांचाही तटकरेंच्या उमेदवारीला कडाडून विरोध होता. मुख्यमंत्री शिंदेंच्या मध्यस्थीने वाद मिटला आहे. हा अंतर्गत वाद विकोपाला जात असल्याचे पाहून सुनील तटकरे यांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आणि स्थानिक पातळीवरील नाराजी दूर करण्याची विनंती केली. मुख्यमंत्र्यांच्या मध्यस्थीनंतर हा विरोध मावळला. विशेष म्हणजे, आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा रायगड दौरा होता आणि त्यांचे हेलिकॉप्टर जमिनीवर उतरण्यापूर्वीच जुईली दळवी यांच्या वतीने त्यांचा उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आला. सोलापूरात ’मविआ’चा मुख्य उमेदवारच बाद सोलापूरमध्ये महायुतीने राजेंद्र राऊत यांना मैदानात उतरवले आहे, तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे आदित्य फत्तेपूरकर रिंगणात होते.

# वयोवृद्ध इसमास लुटणारा सराईत गुन्हेगार जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – शेतीकरीता खत खरेदी करण्याकरीता आलेल्या वयोवृद्धाजवळील १० हजार रुपये हिसकावुन पळुन जाणाऱ्या सराईत गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करुन त्याच्या ताब्यातुन मोबाईल, रोख व दुचाकी असा एकुण ५८ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मनिष अनिल जोशी (वय ३३ रा.पार्वतीनगर अमरावती) असे अटकेतील सराईत गुन्हेगाराचे नाव आहे.

गणपत चिरकुटराव बांबल (वय ७३ रा.गाडेगाव, ता.वरुड) हे २६ मे रोजी सकाळी ९ च्या दरम्यान शेती करीता खत विकत घेण्याकरीता राजुरा बाजार येथे आले होते. तेव्हा चेहऱ्यावर दुप्पटा बांधलेला एक युवक दुचाकीने त्यांच्याजवळ आला आणि वडील दवाखान्यात भरती आहे, असे सांगुन वृद्धाला गाडीवर बसवीले आणि राजुरा बाजार शाळेजवळ नेले. तेथे गेल्यावर त्याने त्यांना चिल्लर पैसे मागीतले तेव्हा बांबल यांनी खिशातील पाकिटमधील १० हजार रुपये काढले. त्याचवेळी आरोपी १० हजार रुपये हिसकावुन तेथुन पळुन गेला.

या घटनेत वरुड पोलिसांनी बांबल यांच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करुन गुन्हा तपासात घेतला तसेच गुन्हे शाखेचे पथक या प्रकरणात समांतर तपास करीत होते.

दरम्यान पथकाला सोमवारी गुप्त माहिती मिळाली की वृद्धाजवळील रक्कम हिसकावणारा आरोपी अमरावती येथील रहिवाशी मनिष अनिल जोशी आहे आणि तो माहुली मार्गे मोर्शीकडे जात आहे. तेव्हा लगेच पथकाने मोर्शी मार्गावर नाकाबंदी करुन त्याला ताब्यात घेतले. त्याची विचारपूस केली असता त्याने गुन्हा कबुल केला.

तेव्हा लगेच पोलिसांनी त्याच्याजवळील दुचाकी क्र.एम.एच.२७ डि.एक्स.३१९१, रोख ६ हजार ३०० रुपये व एक मोबाईल असा एकुण ५८ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन आरोपीला वरुड पोलिसांच्या ताब्यात दिले.

या कारवाईत पोलिस अधिक्षक निकेतन कदम, अपर पोलिस अधिक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक किरण वानखडे, स्थानिक गुन्हे शाखा यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक नितीन इंगोले, पोलिस अंमलदार मोहन मोरे, पुरुषोत्तम यादव, सैय्यद अजमत, स्वप्निल तंवर, चेतन दुबे, नितीन बानखडे, नईम कासम शहा तसेच सायबर सेलचे अंमलदार रितेश गोसामी आणि रुपाली इंगोले यांचा समावेश होता.

# बाळ माने यांची शिवसेना ठाकरे गटातून हकालपट्टी, संजय राऊतांनी दिली माहिती

## उद्धव ठाकरेंकडून पहिली कारवाई, विधान परिषदेतून ऐनवेळी घेतली होती माघार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यातील १७ स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद मतदारसंघासाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे.

आज निवडणुकीतून अर्ज माघार घेण्याचा शेवटचा दिवस असून, याच पार्श्वभूमीवर राज्याभरात घडामोडींना वेग आला आहे. अशातच रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग विधानपरिषद मतदारसंघातून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार (शिवसेना ठाकरे गट) सुरेंद्र ऊर्फ बाळ माने यांनी थेट भाजपचे मंत्री नितेश राणे यांच्यासोबत रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल होत आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे.

बाळ माने यांच्या या धक्कादायक निर्णयामुळे कोकण विधानपरिषद निवडणूक आता बिनविरोध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. बाळ माने यांच्या या निर्णयानंतर आता शिवसेना ठाकरे गटाकडून त्यांच्यावरती कडक कारवाई करत पक्षातून त्यांची हकालपट्टी करण्यात आली आहे.

बाळ माने उमेदवारी अर्ज मागे घेतल्यावर काय म्हणाले? उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना बाळ माने म्हणाले की, 'रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग विधानपरिषद मतदारसंघात महाविकास आघाडीच्या वतीने मी शिवसेना ठाकरे गटाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. आज अंतिम दिवस होता उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा. या निवडणुकीत १०१८ मतदार आहेत. महाविकास आघाडी म्हणून आमचे संख्याबळ २०० च्या आसपास आहे.

# धावत्या ट्रेनमधील दीड कोटींच्या चोरीचा लावला छडा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मुंबई रेल्वे गुन्हे शाखेने गेल्या वर्षअखेरीस मुंबईजवळ धावत्या ट्रेनमध्ये झालेल्या मोठ्या चोरी प्रकरणाचा छडा लावला असून १० सदस्यांच्या टोळीतील चार जणांना अटक केली आहे. या कारवाईत आरोपींकडून १ कोटी ६२ लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील दुर्गम गावांमध्ये लपलेल्या संशयितांचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा, तांत्रिक पथके आणि दंगल नियंत्रण पथकांच्या मदतीने राज्यभर सहा महिने कसून तपास करण्यात आला. या प्रकरणातील उर्वरित सहा फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे छापे सुरू आहेत.

सोलापूर-मुंबई सीएसएमटी सिद्धेश्वर एक्स्प्रेसमध्ये ६ आणि ७ डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्री एका सराफा व्यापाऱ्याच्या बॅगेतून सोने आणि इतर मौल्यवान ऐवज चोरीला गेला होता. मुंबईतील गोरेगाव पश्चिम येथे राहणारे ५२ वर्षीय सोने व्यापारी सोलापूरवरून कल्याणच्या दिशेने एसी डब्यातून प्रवास करत होते. त्यांच्याकडे दोन ट्रॉली बॅग होत्या, मात्र ते झोपेत असताना अज्ञात चोरांनी सोन्याचे दागिने असलेली एक बॅग लांबवली.

# गारगाई धरणाच्या कामाचा शुभारंभ ऑक्टोबरमध्ये

## २०२९ च्या पावसाळ्यात धरण तुडुंब भरणार | मुंबईला ४४० दशलक्ष लिटर पाणी मिळणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मुंबईची पिण्याच्या पाण्याची तहान भागविण्यासाठी गारगाई प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या कामाचा शुभारंभ ऑक्टोबर मध्ये होणार असून २०२९ च्या पावसाळ्यात हे धरण तुडूंब भरणार, अशी माहिती मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली. गारगाई धरणातून मुंबईला ४४० दशलक्ष लिटर पाणी उपलब्ध होणार आहे. दरम्यान, गारगाई धरण प्रकल्पासाठी ६५७ हेक्टर जमीन संपादन करण्यात आली असून धरण क्षेत्रातच ३ लाख झाडांचे पुनर्रोपण करण्यात येणार असल्याची माहिती अभिजीत बांगर यांनी दिली. दरम्यान, प्रकल्पासाठी लागणाऱ्या केंद्र आणि राज्य सरकारच्या दोन महत्त्वाच्या परवानग्या जुलैपर्यंत मिळतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. मुंबईला २०४१ मध्ये ६ हजार ४०० दशलक्ष लिटर पाण्याची गरज भासणार आहे. गारगाई धरण प्रकल्पाची चर्चा गेली १२ वर्षे सुरू आहे, असे स्थायी समिती सदस्या डॉ. सईदा खान म्हणाल्या. मुंबईची वाढती लोकसंख्या लक्षात घेता, गारगाई प्रकल्प तसेच समुद्राचे खारे पाणी गोडे करणे असे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत, असे बांगर यांनी स्थायी समितीत स्पष्ट केले.

# मराठा आरक्षणासाठी शिंदे समितीला पुन्हा मुदतवाढ

## समितीचा कार्यकाळ जून २०२७ पर्यंत वाढवण्याचा राज्य सरकारचा निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबत आवश्यक कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या न्यायमूर्ती सेवानिवृत्त संदीप शिंदे समितीच्या कार्यकाळाला राज्य सरकारने पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे.

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी सरकारसोबतच्या यशस्वी चर्चेनंतर आपले उपोषण मागे घेतल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत या समितीचा कार्यकाळ ३० जून २०२७ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ऐतिहासिक कुणबी नोंदींची काटेकोर तपासणी करून पात्र मराठा बांधवांना प्रमाणपत्रे देण्याच्या उद्देशाने सप्टेंबर २०२३ मध्ये या समितीची स्थापना केली होती.

# जिल्ह्यातील सर्व ८४० ग्रामपंचायतींचा 'माझे गाव आरोग्यसंपन्न गाव' अभियानात उत्स्फूर्त सहभाग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




***अमरावती*** – जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याची सुदृढ आरोग्याकडे यशस्वी वाटचाल सुरू झाली आहे.

जिल्ह्यात सध्या 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' हे अभियान प्रभावीपणे राबविले जात असून, जिल्ह्यातील एकूण ८४० ग्रामपंचायतींपैकी सर्व ग्रामपंचायतींनी या अभियानात शंभर टक्के सहभाग नोंदविला आहे. संपूर्ण जिल्हा आता स्वच्छता आणि आरोग्याकडे विशेष लक्ष देत असून, ग्रामीण भागात या निमित्ताने एक नवीन उत्साह निर्माण झाला आहे.

या मोहिमेत सहभागी झालेल्या सर्व ग्रामपंचायती आणि स्थानिक आरोग्य संस्थांमध्ये आरोग्यविषयक विविध कार्यक्रम राबविले जात आहेत.

अभियानांतर्गत केलेल्या उत्कृष्ट कार्यवाहीच्या जोरावर 'सुदृढ विजेता' म्हणून घोषित होण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींमध्ये आता एक निरोगी स्पर्धा सुरू झाली आहे. गावागावात स्वच्छता आणि आरोग्य सुविधा बळकट करण्यावर विशेष भर दिला जात आहे.

या संपूर्ण मोहिमेचे चोख नियोजन व उद्दिष्टपूर्तीसाठी सर्व ग्रामपंचायतींना आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना वरिष्ठांकडून वेळोवेळी मार्गदर्शन व आवश्यक प्रशिक्षण देण्यात येत आहे, ज्यामुळे या मोहिमेला मोठी गती मिळाली आहे. या अभियानात उत्कृष्ट कामगिरी करून अमरावती जिल्ह्याचे नाव उंचावण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी गांधी यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.प्रवीण पारिसे, सर्व सरपंच, ग्रामसेवक आणि आरोग्य यंत्रणेला शुभेच्छा दिल्या.

# अखेर कॉंग्रेसचंही ठरलं!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***नागपूर***– स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषद निवडणुकीसाठी आज उमेदवारी अर्ज भरण्याचा अंतिम दिवस आहे. दरम्यान हि मुदत संपायला आता अवघ्या काही तासांचा अवधी शिल्लक आहे. असे असताना अखेर महाविकास आघाडीनेही अंतिम टप्पात जागावाटप निश्चित केले आहे. प्रचंड रस्सीखेच आणि जागांवरील दावे-प्रतिदाव्यानंतर अखेर कॉंग्रेसनेही आपल्या उमेदवारांची नावे घोषित केली आहे. महाविकास आघाडीमध्ये कॉंग्रेस ८ जागेवर निवडणूक लढत आहे. मिळालेल्या माहितीनुसार कॉंग्रेसने अद्याप आठ पैकी ५ ठिकाणी आपले उमेदवार घोषित केले आहे. मात्र अद्याप ३ जागांचा पेच कायम असून ती नावेही लवकर घोषित होतील अशी माहिती आहे. विधान परिषद कॉंग्रेस उमेदवारांची यादी १) चंद्रपूर वर्धा – शैलेश देशमुख २) अमरावती – हर्षदीप देशमुख ३) यवतमाळ – साहेबराव कांबळे ४)लातूर – महेश देशमुख ५)सोलापूर – आदित्य फत्तेपूरकर ६) नागपूर– कॉंग्रेसकडून नागपूरसाठी अतुल लोंढे, सुरेश जाग्याशी, दिनेश ढोले आणि सुनीता महल्ले या चार उमेदवारांचे नामांकन भरणार आहे.

# वाघिणीला नव्हे तर तिच्या शावकाला परतवाडा येथे हलविले : वन विभागाचे स्पष्टीकरण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***अमरावती*** – सिंदेवाही परिक्षेत्र (ब्रह्मपुरी प्रादेशिक वनविभाग) येथील 'टी२' नामांकित वाघिणीच्या शावकासंदर्भात काही वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेली माहिती वस्तुस्थितीला धरून नसून दिशाभूल करणारी आहे. या चुकीच्या बातम्यांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये अनावश्यक भीतीचे आणि वन विभागाच्या कार्यपद्धतीबाबत गैरसमजाचे वातावरण निर्माण होत असल्याचे वन विभागाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

याबाबतची खरी वस्तुस्थिती अशी की, सिंदेवाही परिक्षेत्रातील 'टी२' वाघीण मानव-वन्यजीव संघर्ष निर्माण करत असल्यामुळे, वन विभागाने खबरदारीचा उपाय म्हणून तिला तिच्या शावकांसह सुरक्षितपणे पकडले आहे. मात्र, वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्याप्रमाणे 'टी२' वाघिणीला परतवाडा येथे हलवलेले नसून, तिच्या शावकांपैकी एका शावकाला पुढील आवश्यक व्यवस्थापन, सुरक्षितता आणि वैद्यकीय देखरेखीच्या दृष्टीने परतवाडा ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर येथे स्थलांतरित करण्यात आले आहे.

या शावकाला मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सोडण्यात येणार असल्याच्या अफवा देखील पसरत आहेत, परंतु सद्यस्थितीत या 'टी२ क्यूब १' शावकास मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये सोडण्याचा किंवा मुक्त अधिवासात पुनर्स्थापित करण्याचा कोणताही निर्णय अथवा योजना वन विभागाच्या विचाराधीन नाही. शावकाला केवळ सुरक्षित वातावरणात वैद्यकीय देखरेख आणि आवश्यक निगा उपलब्ध करून देणे हाच या स्थलांतराचा प्रमुख उद्देश आहे. प्रसारमाध्यमांनी नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होणार नाही यासाठी वस्तुस्थितीवर आधारित आणि वन विभागाकडून पडताळणी केलेली अचूक माहिती प्रसारित करावी, असे आवाहन वन विभागातर्फे करण्यात आले आहे.

# गणेश गीतेंची माघार, पण गोकुळ गीते अडून बसले, गिरीश महाजनांचं नाशिकच्या 'सस्पेन्स'वर मोठं सुतोवाच

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***नाशिक*** – नाशिक विधानपरिषद निवडणुकीच्या अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी नाशिकच्या राजकारणात अभूतपूर्व घडामोडी घडत आहेत.

महायुतीमधील बंडखोरी रोखण्यासाठी भाजपचे संकटमोचक आणि मंत्री गिरीश महाजन यांनी थेट मैदानात उतरून मोठा खुलासा केला आहे. नाशिकच्या जागेबाबत कोणताही तिढा नसून गणेश गीते माघार घेत आहेत, तर त्यांचे बंधू गोकुळ गीते थोडे आग्रही असले तरी तेही थोड्या वेळात आपली उमेदवारी मागे घेतील, असा विश्वास गिरीश महाजन यांनी व्यक्त केला आहे. गिरीश महाजनांनी काय सांगितले? नाशिकच्या या संपूर्ण राजकीय नाट्यमय घडामोडींवर बोलताना मंत्री गिरीश महाजन म्हणाले, उदय सामंत हे नाशिकमध्ये होते. मात्र गीते हे मुंबईत माझ्यासोबत होते.

आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटलो. नाशिकबाबत कुठलाही तिढा नाही. गणेश गीते यांनी सांगितले आहे की, मी माघार घेतोय. थोड्या वेळात त्यांची माघार होईल. गोकुळ गीते यांच्याशी माझं बोलणं झालं आहे. गोकुळ गीते हे थोडे आग्रही आहेत. पण, त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला आहे. ते देखील थोड्या वेळात आपली उमेदवारी मागे घेतील, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

गणेश गीतेंनी स्पष्ट केली भूमिका दरम्यान, मुंबईतील वरिष्ठ पातळीवरील बैठकीनंतर गणेश गीते यांनीही आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, 'काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री गिरीश महाजन यांच्याशी माझी सविस्तर चर्चा झाली. राज्यात आपली महायुती आहे आणि युतीचा धर्म आपल्या सर्वांना पाळावा लागेल, असे वरिष्ठ नेत्यांनी मला सांगितले. दरम्यान, गणेश गीते माघार घेत असताना गोकुळ गीते सध्या 'नॉट रिचेबल' आहेत. गिरीश महाजन यांनी गोकुळ गीते माघार घेतील असा विश्वास व्यक्त केला असला, तरी महाविकास आघाडी आणि इतर विरोधकांनी गोकुळ गीतेंच्या अपक्ष उमेदवारीला पाठिंबा देण्याची तयारी दर्शवली आहे.

**नोकरी**

मिहान, ऑफीस, बँकींग, अर्धसरकारी प्रोजेक्ट साठी प्रत्येक जिल्हयात भरती. ऑपरेटर, सुपरवायजर, गार्ड, वर्कर, मॅनेजर

वय – १८ ते ३५

पगार – १५,००० ते ३५,००० कमवा

पुजा मॅडम ७७९६३८७१५६
७८८८०६९४५५

# अत्याधुनिक तंत्रज्ञानात महाराष्ट्र देशात अग्रस्थानी! राज्याचे 'क्वांटम' आणि 'डीप टेक' धोरण लवकरच : मुख्यमंत्री फडणवीस यांचा निर्णय

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची निवडणूक आचारसंहिता लागू असताना राज्य सरकारने घेतलेल्या शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाचा तपशील जाहीर झाल्याने आचारसंहितेचा भंग झाला आहे. भारत निवडणूक आयोगाने राज्य सरकारला शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत निर्णय घेण्याची मुभा दिली होती. परंतु, निवडणूक आचारसंहितेच्या काळात असा निर्णय घोषित करण्यास परवानगी दिली नव्हती. तरीही मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारितील माहिती आणि जनसंपर्क खात्याने राज्य मंत्रिमंडळाने घेतलेल्या शेतकरी कर्जमाफीबाबत निर्णयाचे वृत्त प्रसारित केले. त्यामुळे आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांनी बुधवारी निवडक पत्रकारांशी बोलताना मान्य केले.

राज्यातील शेतकऱ्यांकरिता 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' राबविण्यासाठी निर्णय घेण्याबाबत मुख्य सचिवांच्या कार्यालयाने २२ मे २०२६ रोजी निवडणूक आयोगाला लेखी कळवले होते. त्यानुसार आयोगाने राज्य सरकारला शेतकरी कर्जमाफीबाबत निर्णय घेण्यास मान्यता दिली होती. तरीही राज्य सरकारने शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाची माहिती जाहीरपणे दिल्याने निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी आश्चर्य व्यक्त केले.

२५ जूनपर्यंत मुख्य सचिवांची समिती विधान परिषद निवडणूक आचारसंहिता कालावधीत सरकारच्या विविध खात्यांच्या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

# अत्याधुनिक तंत्रज्ञानात महाराष्ट्र देशात अग्रस्थानी!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## 'राज्याचे 'क्वांटम' आणि 'डीप टेक' धोरण लवकरच



**मुंबई** - या ऐतिहासिक निर्णयामुळे संपूर्ण 'डीप टेक परिसंस्थेसाठी' व्यापक धोरण राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार असल्याचा अभिमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. या धोरणांमुळे महाराष्ट्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात क्रांती घडणार असल्याचे बोलले जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील 'वर्षा' या अधिकृत निवासस्थानी या दोन्ही महत्त्वाकांक्षी धोरणांसंदर्भात एक उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीला राज्याचे इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री अॅड.आशिष शेलार यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत धोरणांच्या मसुद्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली असून, आगामी मंत्रिमंडळ बैठकीत या दोन्ही धोरणांना अंतिम मंजुरी दिली जाणार आहे. उच्च कौशल्याधारित रोजगार निर्मितीला मिळणार चालना या बैठकीत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या धोरणांचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, 'राज्यात संशोधन, नवोन्मेष, मोठी गुंतवणूक आणि उच्च कौशल्याधारित रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी ही दोन्ही धोरणे अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मैलाचा दगड ठरणार आहेत.

महाराष्ट्राला जागतिक तंत्रज्ञान केंद्र म्हणून विकसित करण्याच्या राज्य शासनाच्या व्यापक आणि दूरगामी दृष्टिकोनाचाच हा एक मुख्य भाग आहे.' जागतिक स्तरावर महाराष्ट्राचा डंका वाजणार या दोन्ही अद्ययावत धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे महाराष्ट्रात उच्च तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर परदेशी आणि देशांतर्गत गुंतवणूक आकर्षित होणार आहे.

# नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानग्रस्तांचे पंचनामे होणार

## आमदार उमेश यावलकर यांनी घेतली कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – तालुक्यात मे महिन्यात सुर्याची तिव्रता ४५ ते ४६ अंश सेल्सिअसवर गेल्याने आधी अति उष्णतेमानाचा फटका संत्रा बागांसह इतर पिकांना बसला आहे.

संत्रा झाडांना तडण घेण्याआधीच अवकाळी पावसाने वेळेच्या आत हजेरी लावल्याने याचा फटका मृग बहार फुटीवर सुद्धा बसणार असल्याचे दिसून येत आहे. वरुड तालुक्यात ३० मे पासून सतत तीन दिवस चक्रीवादळासह गारपीट व अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने हजारो हेक्टर क्षेत्रावरील संत्रा, मोसंबी बागेतील अबिया बहार, मका, ज्वारी, उन्हाळी तीळ, पाल्याभाजांसह विविध निंबुवर्गीय पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

त्यामुळे अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याचे आदेश देण्यात यावे, अशी मागणी मोर्शीचे आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचेकडे केली असून कृषिमंत्र्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश स्थानिक प्रशासनाला दिले आहेत.

गेल्या आठवडयात निसर्गाच्या अवकृपेचा मोठया प्रमाणात सामना वरुड व मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना करावा लागला, एकीकडे मोठया प्रमाणात तापमान वाढले होते तर दुसरीकडे गेल्या ३ दिवसांपासुन अवकाळी पाऊस, गारपीट, वादळी वाऱ्यामुळे परिसरात मोठया प्रमाणात नुकसान झाले असून याबाबत आ.उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी चर्चा करुन पत्रव्यवहार केला असून आमदारांच्या पत्रव्यवहाराची दखल घेत नुकसानग्रस्तांचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.

### मी शेतकऱ्यांच्या पाठीशी



"वरुड- मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे. जेव्हा जेव्हा शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीचा फटका बसला, तेव्हा तेव्हा मी त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सभागृहात माझी भुमिका स्पष्टपणे मांडली आहे. वरुड तालुक्यात ३० मे पासून सतत तीन दिवस झालेल्या चक्रीवादळासह गारपीट व अवकाळी पावसामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाल्याने मी कृषिमंत्री व पालकमंत्र्यांची भेट घेतली असून नुकसानग्रस्तांचे सरसकट पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत, अशी माहीती आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी दिली.

# अमेरिकेने उगारले पुन्हा 'टॅरिफ-अस्त्र'

## भारतासह ५४ देशांवर १२.५ टक्के अतिरिक्त शुल्काचा प्रस्ताव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वाशिंग्टन** – सक्तीच्या मजुरीतून तयार होणाऱ्या वस्तूंच्या आयातीवर बंदी घालण्यात अपयशी ठरल्याबद्दल अमेरिकेने भारतासह ५४ देशांवर १२.५ टक्के अतिरिक्त आयात शुल्क लावण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधींनी ही माहिती दिली.

काही वस्तूंच्या उत्पादनात वेठबिगार मजुरांचा वापर केला जातो असा अमेरिकेचा दावा असून त्यांच्या आयातीवर बंदी घालण्याची त्याची भूमिका आहे. या संदर्भात 'युएस ट्रेड रिप्रेझेंटेटिव्ह'ने जगातील ६० देशांविरुद्ध चौकशी सुरू केली होती. त्यानंतर आता ही कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. आमच्या अत्यंत महत्त्वाच्या व्यापारी भागीदारांनी सक्तीच्या मजुरीतून बनवलेल्या वस्तूंच्या आयात व निर्यात रोखण्यासाठी पावले न उचलणे हे अस्वीकारार्ह आहे. यामुळे अमेरिकन कामगारांना जागतिक स्तरावर असमान आणि आव्हानात्मक परिस्थितीत स्पर्धा करावी लागत आहे. आम्ही ही असमानता यापुढे सहन करणार नाही, असे अमेरिकेचे म्हणणे आहे.

कापड उद्योगाला सवलत यासोबतच, यूएसटीआरने कापड उद्योगासाठी एक विशेष सवलत देखील प्रस्तावित केली आहे.

# तृणमूल काँग्रेसमधील फुटीवर शिक्कामोर्तब

## बंडखोर आमदारांची संख्या ५८, ऋतब्रत बॅनर्जी यांना पाठिंबा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**कोलकाता** – पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत बंडखोरीने बुधवारी एक अत्यंत नाट्यमय आणि निर्णायक वळण घेतले. पक्षातून हकालपट्टी करण्यात आलेले आमदार ऋतब्रत बॅनर्जी यांना टीएमसीच्या ५८ बंडखोर आमदारांनी विधिमंडळ पक्षनेते म्हणून पाठिंबा दिला आहे. या आमदारांनी आपल्या समर्थनाचे पत्र विधानसभा अध्यक्ष रथींद्र बोस यांच्याकडे सुपूर्द करून अधिकृत पक्ष आपणच असल्याचा दावा ठोकला आहे.

बंडखोर गटाने विधानसभेतील आपल्या नवीन नेतृत्वाची घोषणाही केली आहे. यामध्ये ऋतब्रत बॅनर्जी यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी, तर जावेद खान, संदीपन साहा आणि श्युली साहा यांची उपनेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच रघुनाथगंजचे आमदार अखरु झमान यांच्याकडे मुख्य प्रतोद पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. तृणमलूमध्ये एकूण आमदार संख्या ८० असून अपात्रता टाळण्यासाठी आवश्यक संख्या ५४ आहे.

बंडखोर गटाने ५४ चा आकडा पार करत ५८ आमदारांचे संख्याबळ दाखवले असल्याने, त्यांचा दावा जर विधानसभा अध्यक्षांनी स्वीकारला, तर सभागृहात त्यांना स्वतंत्र गट म्हणून मान्यता मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# अज्ञात चोराने शाळेचे कुलूप तोडुन पळवला टीव्ही

## तालुक्यातील पवनी सक्राजी येथील जिल्हा परिषद शाळेतील घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** - शाळेच्या वर्ग खोलीचे कुलूप तोडुन अज्ञात चोराने आत प्रवेश केला आणि खोलीतील ४ हजार रुपये किमतीचा 'इंटेक्स' कंपनीचा टीव्ही चोरुन नेल्याची घटना नुकतीच पवनी सक्राजी येथे उघडकीस आली आहे. या प्रकरणी वरुड पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पवनी सक्राजी येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक गजानन रामजी चोरे (५६), रा.वरुड हे शाळेत गेले असता त्यांना वर्गखोलीचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत दिसले. जवळ जाऊन पाहणी केली असता चोरट्याने दरवाजाचा कळी-कोंडा जबरदस्तीने वाकवुन आत प्रवेश केल्याचे उघड झाले. वर्ग खोलीची आतुन पाहणी केली असता तिथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वापरासाठी ठेवलेला ४ हजार रुपये किमतीचा 'इंटेक्स' कंपनीचा टीव्ही गायब असल्याचे लक्षात आले.

या प्रकरणी फिर्यादी गजानन रामजी चोरे (५६), रा.वरुड यांच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला असुन या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरुड पोलिस करीत आहे.

